नागरी भागातील शासकीय भूखंडाचे
झोपडपट्टयांपासून व अतिक्रमणापासून संरक्षण
करण्यासाठी कुंपण घालणे, सुरक्षा रक्षक नेमणे
---
नवीन उपशिर्ष उघडण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक जमीन-२६९०/प्र.क्र. ३७४७/ज-३
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १९ ऑगस्ट, १९९२

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्यातील निरनिराळ्या विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या शासकीय भूखंडाचे संरक्षण करण्याचे काम त्या त्या विभागाचे आहे. त्यानुसार मुंबई उपनगर जिल्हयातील शासकीय भूखंडाचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी कुंपण घालणे व सुरक्षा रक्षकाची नेमणूक करणे आवश्यक झाले आहे. मुंबई उपनगर जिल्हयाशी संबंधीत खर्चाच्या लेखा नोंदीसाठी अर्थसंकल्पिय अंदाज पत्रकात सध्या आवश्यक ते उपशिर्ष नसल्याने "ते" मागणी क्रमांक सी-१-२०२९ जमीन महसूल या मुख्य लेखाशिर्षाखाली पुढीलप्रमाणे नवीन उपलेखाशिर्ष उघडण्यात येत आहे :-

" २०२९, जमीन महसूल

८००, इतर खर्च

८०० [तीन] शासकीय जमिनीच्या भूखंडाचे संरक्षण करण्यासाठी कुंपण घालणे व सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे,

[२] जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

[दत्तमत] २०२९-०७७-२"

२. हे आदेश तत्काळ अमलांत येतील.

३. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६६५-अ/अर्थसंकल्प-४, दिनांक११ ऑगस्ट, १९९२ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

म. मु. शिंदे

[म. मु. शिंदे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
25 AUG 1992
शाखा-
प्र. नि. जि. नि. जिल्हाधिकारी

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हील, मुंबई